NAVJYOT /Vol. XII / Issue – I ISSN 2277-8063

# महात्मा गांधी यांचे सत्याग्रह विषयक कार्य

**माधुरी बाबुराव घाटगे,** संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र अधिविभाग,शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

---

**प्रस्तावना:** महात्मा गांधीयांनी सत्याग्रह आणि अहिंसा या तत्वांचे अनुसरण करून त्यांनी भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. त्यांनी जीवनाच्या प्रत्येक परिस्थितीत अहिंसा व सत्याचे अनुसरण करून गांधीवादी विचारसरणीचा सर्व जगासमोर आदर्श ठेवला आहे. सत्याग्रहाच्या व अहिंसावादी या शस्त्राचा वापर करून भारताला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या महात्मा गांधी यांच्या निवडक सत्याग्रहाविषयी या शोधनिबंधात जाणून घेणार आहोत तसेच त्यांनी सत्याग्रहासाठी अवलंबविलेले मार्ग म्हणजे उपोषण, धरणे, आंदोलन, बहिष्कार अशा विविध मार्गाद्वारे सत्याग्रह पद्धती पुढील पिढीसाठी मार्गदर्शक बनलीआहेत.

सत्यग्रहाच्या रूपाने महात्मा गांधींनी एकीकडे युद्धाला व हिंसाचारला पर्याय दिला तर दुसरीकडे भारतातीलच नव्हे तर संपूर्ण जगातील शोषित, पीडित,पारतंत्र्य, दु:खी व दुर्बल माणसांच्या हातात अन्यायाच्या विरोधात लढण्याचे धारदार व लखलखीत शस्त्र दिले. सत्याग्रह वैयक्तिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय समस्या सोडविण्याची सुप्त शक्ति असते. सत्याग्रहाद्वारे कोणत्याही प्रकारचे मतभेद व तंटे मिटविता येतात. म्हणून महात्मा गांधींनी सत्याग्रह म्हणजे प्रश्न किंवा समस्या सोडविण्याची गुरुकिल्ली आहे असे सत्याग्रहाचे वर्णन केलेले आहे.

**सत्याग्रहाचा अर्थ :** सत्याग्रह हा संस्कृत शब्द आहे. हा शब्द सत्य आणि आग्रह या दोन शब्दापासून बनला आहे म्हणून सत्याग्रहाचा शब्दश: अर्थ सत्याचा आग्रह असा आहे. म.गांधींनी सत्याला चिकटून राहणे म्हणजे सत्याग्रह अशी सत्याग्रहाची व्याख्या सांगितलेली आहे. ते म्हणतात Satyagraha is a relentless search for truth and determination to reach truth. त्यांच्या मते सत्याग्रह म्हणजे सत्य बळ वा प्रेम बळ वा नीती बळ होय. म्हणून त्यांच्या मते सत्याग्रह म्हणजे आत्मिक शक्तीच्या जोरावर अन्याय व पिळवणुकीच्या विरोधात केलेला प्रतिकार व प्रत्यक्ष कृती होय. म. गांधीजीच्या मते चुकीचा कायदा मोडणे हे सत्याग्रहात अभिप्रेत आहे.

**भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा संघर्ष 1916-1945**

1914 मध्ये गांधी दक्षिण आफ्रिकेतून भारतात परत आले. तोपर्यंत गांधी राष्ट्रवादी नेते व संयोजक म्हणून प्रतिष्ठित झाले होते. कोंग्रेसचे मध्यम नेते गोपाळ कृष्ण गोखले यांच्या सांगण्यावरून ते भारतात आले आणि प्रारंभीच्या काळात गांधीच्या विचारांवर गोखले यांच्या विचारांचा प्रभाव पडला. सुरूवातीला गांधींनी देशाच्या विविध भागात जाऊन राजकीय, आर्थिक आणि सामाजिक विषय समजून घेण्याचा प्रयत्न केला.

**चंपारण्य व खेडा सत्याग्रह**

बिहारमधील चंपारण्य आणि गुजरातमधील खेडा येथे झालेल्या चळवळीमुळे गांधीनी भारतातील पहिले राजकीय यश मिळाले. चंपारण्य मधील शेतकऱ्याची युरोपियन मेळवाल्यांकडून न खूप पिळूवणूक होत होती. चंपारण्यामधील ब्रिटिश जमीनदारानी शेतकऱ्यांनी अन्नधान्य पिकाऐवजी निळीची लागवड करण्यास भाग पाडले. यामुळे शेतकऱ्यांची परिस्थिती बिकट झाली. यामुळे ते अत्यंत गरिबीने वेढले गेले होते.विनाशकारी दुष्काळानंतर ब्रिटिश सरकारने दडपशाही आणि कर याचा अतिरिक्त बोझा दिवसेंदिवस वाढत आहे. गांधीजींनी जमीनदारांच्या विरोधात निषेध व संपाचे नेतृत्व केले त्यानंतर गरीब आणि शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य केल्या गेल्या.

१९१८ मध्ये गुजरातमधील खेडापूर दुष्काळाने ग्रासले आणि त्यामुळे शेतकरी व गरिबांची परिस्थिती बदलली आणि लोकांनी कर माफीची मागणी केली. खेडा येथे गांधीजीच्या मार्गदर्शनाखाली सरदार पटेल. यांनी शेकऱ्यांच्या समस्येवर इंग्रजांशी चर्चा केली. यानंतर ब्रिटिशांनी सर्व कैद्यांना महसूल वसुलीपासून मुक्त करून सोडले. अशा प्रकारे चंपारण्य आणि खेडा नंतर गांधीची कीर्ती देशभर पसरली आणि स्वातंत्र्य चळवळीचे ते महत्त्वाचे नेते म्हणून पुढे आले.

**मिठाचा सत्याग्रह :** इंग्रज सरकारने मिठावर कर लावल्याने त्याचा बोजा गरीब जनतेवर पडत असे. समुद्रात मीठ तयार करण्याचा भारतीयांना पूर्ण अधिकार आहे त्यावर इंग्रज सरकारला पायाबंदी करण्याचा कोणत्याच प्रकारचा अधिकार नाही.महात्मा गांधी यांनी आपली पदयात्रा सुरूच ठेवली वाटेत त्यांना देशातील अनेक लोक येवून भेटली

व त्यांच्या पदयात्रेत सहभागी झाली. ५ एप्रिल १९३० रोजी ३८८ किमी चे अंतर पूर्ण करून त्यांची पदयात्रा दांडी येथे पोहचली. ६ एप्रिल च्या पहाटे महात्मा गांधी यांनी आपली नेहमीची प्रार्थना विधी आटोपून घेतल्यानंतर ते समुद्र किनाऱ्याकडे चालत गेले. सकाळी ठीक आठ वाजून तीस मिनिटांनी त्यांनी मिठाचा खडा उचलून इंग्रज सरकारने लावलेला मिठाचा कायदा मोडून काढला. या प्रकरणी त्यांना पकडून कैद करण्यात आले, त्यामुळे संपूर्ण देशात हिंसात्मकरित्या आंदोलनाला सुरवात झाली. हा सत्याग्रहाचा माध्यमातून लोकसंघटन आणि लोक जागृती करायची होती.

या घटनेबरोबर देशात अनेक ठिकाणी सविनय कायदेभंग आंदोलनाला सुरुवात झाली. गुजरातमधील धरासना, महाराष्ट्रातील बंडाळी, कर्नाटकामधील शनिकट्टा, शिरोड व मालवण इत्यादी ठिकाणी मिठाचे सत्याग्रह विशेष प्रसिद्ध झालेले दिसतात.असहकार चळवळीच्या वेळी अटकेनंतर गांधींना फेब्रुवारी 1924 मध्ये सोडण्यात आले आणि ते 1928 पर्यंत सक्रिय राजकारणापासून दूर राहिले. या काळात त्यांनी स्वराज पक्ष आणि कॉंग्रेसमधील विरक्ती कमी केली आणि या व्यतिरिक्त अस्पृश्यता, मद्यपान, अज्ञान आणि दारिद्र्याविरूद्ध लढा दिला.1934 मध्ये गांधींनी कॉंग्रेसच्या सदस्याचा राजीनामा दिला. राजकीय उपक्रमांऐवजी त्यांनी 'रचनात्मक कार्यक्रमांद्वारे' खालच्या पातळीवरुन 'देश घडवण्याकडे आपले लक्ष केंद्रित केले. ग्रामीण भारतातील शिक्षणाचे काम, अस्पृश्यतेच्या विरोधात चळवळ सुरू ठेवणे, सूत कातणे, विणकाम आणि इतर कुटीर उद्योगांना चालना देणे आणि लोकांच्या गरजेनुसार शिक्षण व्यवस्था निर्माण करण्याचे काम त्यांनी सुरू केले.

**अहमदाबाद येथील कामगार लढा**

सन १९१४ साली झालेल्या पहिल्या युद्धानंतर देशात खूप महागाई वाढली होती. अहमदाबाद येथील कामगारांनी वेतनवाढी करीता गिरणी मालकांकडे विनंती केली. परंतु, त्याची मागणी मान्य करण्यात आली नाही.

गांधीजीनी त्या ठिकाणी स्वत: जावून संप पुकारला व उपोषणाला बसले. कामगार देखील गांधीजींसोबत उपोषणाला बसले. गांधीजींच्या अहिंसावादी आंदोलना समोर गिरणी मालकांनी हार पत्करली व कामगारांना वेतनवाढ दिली.

**असहकार चळवळ**

महात्मा गांधी हे अहिंसेचे पुजारी असल्याने इंग्रजांविरुद्ध त्यांनी असहकार, अहिंसा आणि शांततामय विरोध हे तीन शास्त्र वापरले. सन १९१९ साली पंजाबमधील जालियानवाला बाग हत्याकांड प्रकरणामुळे देशातील लोकांच्या मनात इंग्रज सरकार बद्दल क्रोधाचा भडका उडाला. देशात जागोजागी मोर्चे निघू लगले, ते मोर्चे दडपून काढण्यासाठी इंग्रज सरकारला खूप दमछाक करावी लागली.

महात्मा गांधी यांनी जालियानवाला बाग हत्याकांडा प्रकरणी इंग्रज सरकारचा निषेध केला. सहकार चळवळ सुरु करण्यामागे महात्मा गांधी यांचा असा हेतू होता की, भारतातील ब्रिटीशांचे राज्य हे केवळ भारतातील लोकांच्या सहकार्यावर अबलंबून आहे. जर भारतीयांनी त्यांना विरोध केला तर त्यांचे शासन पूर्णपणे ढासळून जाईल. या हेतूने त्यांनी जनतेला आपल्या असहकार आंदोलनात सहभागी होण्यास सांगितल. गांधीना वाटू लागलं की, आपण असहकार आंदोलन सुरु करून लोकांना अहिंसेच्या मार्गावर चालायला लावलं परंतु, अहिंसेच्या मार्गावर चालणे इतक सोप नाही.

**सहकार आंदोलना दरम्यान घडलेली चौराचोरी घटना**

सन १९२२ साली उत्तर प्रदेश राज्यातील गोरखपुर जिल्हाच्या चौरीचौरा भागात एका शांततापूर्ण चाललेल्या मिरवणुकीवर पोलीसांनी गोळीबार केला. पोलिसांनी केलेल्या गोळीबारामुळे असहकार चळवळीत सहभागी नागरिक खूप चिडले, त्यांनी प्रतिउत्तर म्हणून तेथील एक पोलीस चौकी जाळून टाकली. या जाळपोळीत एक पोलीस अधिकारी व २२ पोलीस ठार झाले.

या घटनेची माहिती गांधीजीना समजली तेव्हा त्यांना खुप वाईट वाटलं, ते एकदम अस्वस्थ झाले. त्यांना वाटलं लोकांनी असे करायला नाही पाहिजे होत. तसेच सत्य आणि अहिंसेच्या मार्गाचा पुरस्कार करत महात्मा गांधी यांनी असहकार आंदोलन मागे घेतले. इंग्रज सरकारने फक्त आश्वासन देते आहे आणि आपली सत्ता सोडण्यास

तयार नाही हे पूर्णत: लक्षात येताच महात्मा गांधी यांनी इंग्रज सरकार युद्धात व्यस्त असल्याने संधी समजून सन १९४२ साली 'भारत छोडो' हे आंदोलन सुरु केले.

अशा अनेक आंदोलने, सत्याग्रह, धरणे, उपोषणे, बहिष्कार, स्वदेशी, स्व: त्याग, देशप्रेम, राष्ट्र निष्ठा या आधारवर त्यांनी गांधीवादी विचारणाचा पाया रचला आणिसत्याग्रह विषयक कृती आणि कार्य याची एक सूत्रबद्ध अलिखित नियमावलीच जणू सर्वासमोर मांडली असे म्हणता येईल.

**समारोप:**

महात्मा गांधी हे अष्टपैलू व्यक्तिमत्व त्यांच्या व्यक्तिमत्व विचारांतून सर्व जगाला मान्य होईल आणि त्या आधारे जीवन जगणे खूप सुखकार करता यईल, असे दिसून येते. त्यांनी सत्य अहिंसा या आधारे शोषक वर्गाचे मनपरिवर्तन करण्याचे आणि आपणास व समाजास उपयुक्त अशी व्यवस्था निर्माण कशी करतात येते याचे उत्तम उदाहरण आपल्या जीवनशैलीतून, तसेच प्रस्थापित ब्रिटिशांच्या विरोधात दिलेल्या लढ्यातून लक्षात येते. त्यांनी सत्याग्रहासाठी अवलंबविलेले मार्ग म्हणजे उपोषण, धरणे, आंदोलन, बहिष्कार अशा विविध मार्गाद्वारे सत्याग्रह पद्धती पुढील पिढीसाठी मार्गदर्शक बनली आहेत.

**संदर्भ सूची:**

1. आचार्य जावडेकर- गांधीवाद.
2. लोखंडे नीळकंठ- गांधीजींना अभिप्रेत जीवनपद्धती रमेश ओझा (संपादक) गांधी, खुर्द आणि बुद्रुक, सेवाग्राम कनेक्टीव्हिटी आणि साधना प्रकाशन.
3. द.ना.गोखले- मानव व आणि महामानव.
4. https://mr.wikipedia.org/महात्मागांधी
5. https://marathidigital.com/mahatma-gandhi-information-marathi/
6. https://www.marathibiography.com/mahatma-gandhi-biography-in-marathi/